(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE : CCXXVI (226)

## Domestic Violence: Impact on Indian Society




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

Guest Editor:
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

ISSN : 2278-9308
March 2020

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महिलांवरील अत्याचार | डॉ. विजय टोंगे | 1 |
| 2 | स्वामी विवेकानंद यांचे धर्म आणि भारत राष्ट्र याविषयीचे विचार | प्रा.विलास मेश्राम | 6 |
| 3 | महिला उत्पीडन आणि स्वामी विवेकानंद | प्रा. पंकज वा. मुन | 10 |
| 4 | स्त्री आणि घरगुती हिंसा | सुरेश महादेवराव देशमुख | 14 |
| 5 | कौटुंबिक हिंसाचार आणि महिला | डॉ. सुनिल शिंदे | 19 |
| 6 | ताण—तनाव : कारणे, परीणाम आणि उपाययोजना | प्रा. आदित्य कि. सारवे | 23 |
| 7 | कौटुंबिक हिंसाचाराचे समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे | 27 |
| 8 | भारतीय कुटुंब व्यवस्था आणि घरगुती हिंसाचार | प्रा.डॉ.राजेंद्र मुर्लिधरराव झाडे | 33 |
| 9 | मानवी हक्क आणि कौटुंबिक हिंसा | डॉ. प्रमोद माधवराव आचेगावे | 36 |
| 10 | जाहिरात : एक अध्ययन | डॉ. सुरेश बन्सपाल | 39 |
| 11 | कौटुंबिक हिंसाचाराची कारणे व उपाय | सहा. प्रा. वसंता सिताराम वंजारी | 43 |
| 12 | बदलत्या काळानुसार स्त्रीयांची बदलती वर्तणुक | प्रा.डॉ. छाया निलकंठ लंजे | 46 |
| 13 | घरगुती हिंसाचार — एक ऐतिहासिक विवेचन | डॉ. अनुश्री माहुरकर | 49 |
| 14 | कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण | डॉ. मदन जी. प्रधान | 52 |
| 15 | कुटूंबातील कुटूंबप्रमुख आणि घरगूती हींसा | सहा.प्रा. गिरिश गं. गवई | 56 |
| 16 | क्रिडाक्षेत्र व महिला | प्रा.धनंजय गिऱ्हेपुजे | 58 |
| 17 | कौटुंबिक हिंसाचार: भारतीय समाजात हुंडा पध्दत एक कारण | प्रा. चौधरी गोपाल विश्वनाथ | 60 |
| 18 | कौटुंबिक हिंसेतील भिन्नता:—पूर्वी व आता | प्रा.भूमिका आनंदरावजी कापगते | 62 |
| 19 | आजची संस्कृती आणि घरगुती हिंसाचार | प्रा.डॉ. सुनील पखाले | 65 |
| 20 | कौटुंबिक हिंसाचार : एक सामाजिक समस्या | प्रा. बळीराम वसंतराव पवार | 67 |
| 21 | नियतकालिके: बुध्दिजीवी समाजाची आवश्यकता | डॉ. पल्लवी साहेबराव काळे | 70 |
| 22 | महिलांच्या संदर्भात कौटुंबिक हिंसाचार आणि भारतीय कायदे | प्रा. रिता प्रेमदास खोब्रागडे | 73 |

**B.Aadhar** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) -7.675, Special Issue**
**ISSN : 2278-9308 March 2020**

# कौटुंबिक हिंसाचार आणि महिला

डॉ. सुनिल शिंदे
अर्थशास्त्र विभागप्रमुख भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

सारांश

८ मार्च हा जागतिक महिला दिवस म्हणून संपूर्ण जगामध्ये साजरा केला जातो. या दिनाच्या निमित्याने महिलांचे सामर्थ्य, कर्तुत्व, नेतत्व आणि सामाजिक बांधीलकी या विषयावर मंथन करतांना लहानांपासून तर मोठ्यापर्यंत संपूर्ण समाजघटकापासून महिंलावर कौतुकाचा वर्षाव केला जातो. पूरूषप्रधान संस्कृतीमध्ये महिलांचे पुर्विचे स्थान'चूल आणि मुल' यापुरतेच मर्यादीत न राहता आज महिला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरूषांच्या बरोबरीने स्वत:चे योगदान देत आहेत. स्वत:ला सिध्द करीत आहेत. आजच्या महिला जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रामध्ये मागे नाहीत विविध क्षेत्रामध्ये त्यांनी उच्च स्थान प्राप्त केलेले आहे. त्यामुळे विविध क्षेत्रातील महिलांनी केलेल्या उल्लेखनिय कार्याचा गौरव म्हणून महिलांना सन्मानित केले जाते. परंतु वास्तविकता ही आहे की, या समाज घटकापासून महिलांना खरोखरच सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सास्कृतिक क्षेत्रातील त्यांचे महिलांचे योगदान, महिलांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या यावर खऱ्या अर्थाने मंथन करून त्याचे सर्व क्षेत्रातील योगदान मान्य केले जाते काय?स्त्री— पूरूष समानतेचे सर्वच समर्थन करतात. परंतु खरोखरच स्त्री— पूरूष समानता आपल्या देशामध्ये आहे काय?स्त्री— पूरूषांना समान कार्यासाठी समान वेतन दिले जात काय?असे विविध प्रश्न निर्माण होतात. या सर्व प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्यास या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी असेच प्राप्त होईल.

कोणत्याही देशामध्ये जात, पंथ, धर्म या नावावर जो हिंसाचार होतो त्यामध्ये सर्वात जास्त हिंसाचाराचे बळी महिलाच ठरतात. भारत सुध्दा त्याला अपवाद नाही. जेव्हा जेव्हा देशामध्ये जातीच्या किंवा धर्माच्या नावावरून हिंसा उफाळते तेव्हा तेव्हा जे आंदोलने होतात. त्या आंदोलनामध्ये महिलांनाच सामोरे केले जाते त्यामुळे हिंसेमध्ये सर्वात जास्त बळी हा महिंलांचाच जातो. दिल्लीमध्ये देशाच्या नागरीकत्व सुधारणा कायद्याच्या विरोधात शाहिनबाग येथिल आंदोलनामध्ये महिलांनाच सामोरे करण्यात आल्यामुळे जो हिंसाचार उफाळला त्यामध्ये महिलांचाच बळी गेला. तसेच कामाच्या ठिकाणी, प्रवासाच्या ठिकाणी आणि घरघुती हिंसाचाराला महिला ह्याच प्रामुख्याने बळी पडतात. महिलांच्या घरघुती हिंसाचाराच्या घडलेल्या घटनांचा शोध घेतल्यास असे निदर्शनास येईल की, या घटनांच्या मागे जात किंवा धर्म, सुशिक्षित किंवा अशिक्षित असे कारणे आपल्याला दिसणार नाहित महिलांवरील घरघुती हिंसाचाराच्या घटना ह्या सर्व जातीमध्ये, धर्मामध्ये, सुशिक्षित व असुशिक्षित कुटुंबामध्ये घडत आहेत. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचा विषय हा कौटुंबिक हिंसाचार आणि महिला असा असून यामध्ये कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय? कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप, हिंसाचाराचा महिलांच्या आरोग्यावर होणारा परीणाम, कौटुंबिक हिंसाचाराची कारणे, हिंसाचार रोखण्यासाठी उपाय, कौटुंबिक हिंसाचार कायदा—२००५ मधील तरतुदी, महाराष्ट्रशासनाच्या उपाययोजना इत्यादींचे सविस्तर विश्लेषण करण्यात आलेले आहे.

➢ हिंसाचार म्हणजे काय?

कोणत्याही माणसाला किंवा व्यक्तिला शारीरिक, मानसिक इजा होईल असे जाणून—बुजून किंवा नकळत केलेले कत्य म्हणजे हिंसा होय. आपल्या देशामध्ये ज्यांच्या हातात सत्ता आणि नियंत्रण असते तो दुसऱ्या घटकावर हिंसाचार करतांना दिसतो. त्यामध्ये पुरूष—पुरूषांवर,

पुरूष—महिलांवर, महिला —महिलांवर हिंसाचार करीत असतात. परंतु आपल्या समाजात पुरूषांना महत्व आहे आणि महिलांना नेहमी दुय्यम स्थान दिले आहे. अशा भेदभावामुळे सर्वात जास्त महिलांवर वेगवेगळ्या पातळ्यावर हिंसा होत आहे.

➢ कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा—२००५ नुसार "व्यथित महिलाच्या शारीरीक किंवा मानसिक आरोग्यास, सुरक्षिततेत, एकुण जीवितेस, कल्याणास धोकादायक परिस्थितीत नेणारे वातावरण तसेच व्यथित महिलाच्या जीवनासकिंवा कोणत्याही अवयवास घातक किंवा उपद्रवी ठरेल अशी वागणुक व्यथित महिलाचालैंगिक छळ, लैंगिक दुरूपयोग, शाब्दीक किंवा भावनिक छळ, आर्थिक छळ होत असेल तर तो कौटुंबिक हिंसाचार समजला जाईल."

➢ महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराचे स्वरूप

१) शारीरिक हिंसा :— शारीरिक हिंसेमध्ये हिंसा करणारा व्यक्ती हा महिलांवर नियंत्राण ठेवण्यासाठी, शारीरिक इजा किंवा धमकीचा वापर करणे, वस्तूने अथवा हाताने मारहान करणे, ठोसा मारणे, गळा दाबने, चटका देणे, थप्पड मारणे, लाथ मारणे, सुरा, चाकु, काठी, दाभन, भांडी, सळई सारख्या हत्याराचा वापर करणे इत्यादीचा समावेश होतो.

२) मानसिक किंवा भावनिक हिंसा :— यामध्ये समोरच्या व्यक्तिवर सतत टिका करणे, चुका काढणे, अपमान करणे, वाईट व हिन वागणूक देणे, परावलंबी व दुय्यम असल्याची जाणीव करून देणे, आवडत्या वस्तूचे नुकसान करणे, वारंवारीक शाब्दीक मार व अबोला धरणे, माहेरच्या लोकांबद्दल वाईट बोलणे, संशय घेणे, अविश्वास दाखविणे, वारंवार घरातून निघुन जाण्यास सांगणे इत्यादीचा मानसिक किंवा भावनिक हिंसेमध्ये समावेश होतो.

३) लैंगिक छळ :— कोणत्याही प्रकारे शारीरिक बळाचा वापर करून किंवा न करता देखिल महिलेला तिच्या इच्छेविरूद्ध लैंगिक संबंध करावयास भाग पाडणे म्हणजेच जबरदस्तीने संभोग, बलात्कार, छेडछाड, लैंगिक अवयवांना इजा तसेच नको असतांना शारीरिक स्पर्श, लग्न, लैंगिक भाषेचा वापर, मोबाईलवरून अश्लिल बोलणे, अश्लिल चित्र, व्हिडीओ पाठविणे, फेसबुक, इमेल, व्हॉटसअॅप वरून मैत्री करून लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक छळ करणे, महिलांच्या इच्छेविरूद्ध किंवा माहित नसतांना त्याच्या लैंगिक अवयवांचे फोटो काढणे इत्यादीचा लैंगिक छळामध्ये समावेश होतो.?

४) नियंत्रण किंवा बंधने घालणे :—महिलेला घराबाहेर काम करण्यास मज्जाव, एकाकी पाडणे, सतत देखरेख ठेवणे, माहिती, पैसा, साधनसामुग्रीवर नियंत्रण ठेवणे, स्वत:च्या पायावर उभे राहायला आडकाठी आणणे, महिलाकडील दागिणे काढून घेणे., हुंड्यासाठी व माहेरून पैसे आणण्यासाठी छळ, महिलांना स्वत:च्या इच्छेप्रमाणे वागायला न मिळणे, समाज माध्यमांचा वापर करून फसविणे इत्यादीचा समावेश यामध्ये होतो.

➢ हिंसाचाराचे महिलांच्या आरोग्यावर होणारे परीणाम

हिंसाचाराला बळी पडलेच्या महिलांच्या शरीराला दुखापत व मनावर आघात होत असतात याचा परीणाम महिलांच्या आरोग्यावर होत असतो. सतत डोक दुखत राहणे, अंग दुखणे, भुक न लागणे, अंगावरून पांढरे जाणे, हाड मोडणे, जखमा होणे, या शारीरिक दुखापतीसोबतच चिडचिड होणे आत्मविश्वास गमावून बसणे, झोप न येणे, एकटे वाटणे, भिती वाटणे, आयुष्यात कोणत्याही गोष्टीत रस न वाटणे, सतत रडणे, विचार करत राहणे, आतल्या आत कुढत राहणे, आत्महत्येचा प्रयत्न करणे इत्यादी बाबी स्त्रीयांच्या आरोग्यावर वाईट परीणाम करतात.

ISSN : 2278-9308
March 2020

➤ कौटुंबिक हिंसाचाराची कारणे

महिलांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराची कारणे अनेक आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये पुरातन काळापासून पुरूषप्रधान व्यवस्था आहे. या व्यवस्थेत महिलांचे महत्व कमी आहे. त्यामुळे कुटुंबातील निर्णय पुरूष घेतात मात्र निर्णय चुकल्यास महिलांनाच जबाबदार धरले जाते. भारतामध्ये महिलांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसेला हुंडा प्रथा जबाबदार आहे. हुंडा न मिळाल्यामुळे किंवा कमी हुंडा मिळाल्यामुळे महिलांचा कुटुंबात छळ केला जातो. पुरूषांच्या व्यसनाधिनतेला सुध्दा महिलांना बळी पडावे लागते. कुटुंबातील हलाखीची आर्थिक स्थिती महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराचे महत्वाचे कारण आहे. अनेक कुटुंबामध्ये पतीचे विवाहबाह्य संबंध नवरा बायकोच्या भांडण्याचे कारण बनते. याशिवाय मुलबाळ न होणे, पतीचा संशयी स्वभाव, पुरूषांच्या इच्छेविरूध्दात झालेले लग्न, सुनेमुळे सासुच्या वर्चस्वाला बसणारा धक्का ही महिलांवरील हिंसाचाराची कारणे दिसून येतात.

➤ कौटुंबिक हिंसाचारावर उपाय

महिलांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचार बंद व्हावा आणि हिंसाचाराला जबाबदार व्यक्तीवर कायदेशिर कारवाई व्हावी यासाठी शासकीय स्तरावर कायदे करण्यात आलेले आहे. परंतु केवळ कायदे करून महिलांवरील हिंसाचार कमी होणार नाही तर कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसोबतच महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढऊन हिंसाचाराच्या विरोधात लढण्यासाठी त्यांच्यामध्ये जागृती निर्माण केली पाहिजे. महिला संघटनांनी महिला हिंसाचाराच्या विरोधात महिलांना एकत्रित करून लढा उभारला पाहिजे. तसेच महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी आर्थिक दृष्ट्या सक्षम केले पाहिजे. यासाठी बचत गटासारख्या चळवळींना प्रोत्साहन दिले पाहिजे. अनेक महिलांवर होणाऱ्या हिंसाचारामध्ये पुरूषांइतकाच महिलांचासुध्दा सहभाग असतो. महिलांनी पीडीत महिलेला एकटे न पाडता पीडीत महिलेच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहिले पाहिजे यासाठी महिलांच्या मनोवत्तीत बदल झाला पाहिजे.

➤ कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा—२००५

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करण्यासाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा—२००५ हा महिलांसाठी निर्माण केला आहे. हा कायदा महिलांना अन्यायाच्या विरोधात लढण्याचे बळ देतो. या कायद्यातीलकाही प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहे.१) या कायद्यातील कलम १२ नुसार पीडीत महिला स्वत: अथवा तिच्या वतीने इतर व्यक्ती प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यापुढे अर्ज करून संरक्षण मागु शकते. असे अर्ज आल्यास न्यायाधीस त्या महिलेला संरक्षण देण्याचे आदेश देऊ शकतात.

२) या कायद्याचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे कलम १७ नुसार संबंधित न्यायालय नवऱ्याच्या घरात राहण्याचा अधिकार पीडीत महिलेला देते.

३) या कायद्याच्या कलम १८ नुसार पीडीत महिलेवर कोणत्याही प्रकारचा अत्याचार न करण्याचा आदेश न्यायालय देऊ शकते.

४) या कायद्याच्या कलम २० नुसार पीडीत महिला आणि तिच्या मुलांना पोटगीचा अधिकार देण्यात आलेला आहे.

५) या कायद्याच्या कलम २५ नुसार पीडीत महिला नुकसानभरपाई, वैद्यकीय खर्च आणि कुटुंबाने घरातून बाहेर काढल्यास घरभाडे देण्याचा आदेश न्यायालय देऊ शकतें. पीडीत महिला नौकरी करीत असल्यास तिच्या कामाच्या ठिकाणी जाऱ्यापासून पती व इतर नातेवाईकांना जाऱ्यापासून न्यायालय मज्जाव करू शकते. पीडीत महिलेच्या अज्ञान मुलांना तिच्यापासून हिरावल्यास मुलांना पुन्हा तिच्या ताब्यात देण्याचा आदेश न्यायालय देऊ शकते.

➢ महाराष्ट्र शासनाच्या उपाययोजना

१) पीडीत महिलांना कौटुंबिक छळापासून संरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्र सरकारच्या महिला व बाल विकास विभागाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना तात्पुरते संरक्षण अधिकारी म्हणून घोषित केले आहे.

२) शासनाने जिल्हास्तरावरील पोलीस स्टेशनमध्ये ३९ समुपदेशन केंद्रे निर्माण केली आहेत. तालुकास्तरावर १०५ समुपदेशन केंद्रे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या केंद्रामध्ये कौटुंबिक कलह मिटविण्याचा प्रयत्न केला जातो.

३) पीडीत महिलेला तक्रार करण्यासाठी १०९१ हा टोल फ्री दुरध्वनी क्रमांक पोलीस स्टेशनमध्ये सुरू करण्यात आलेला आहे. पीडीत महिला टोल फ्री नंबरवर कौटुंबिक छळापासून संरक्षण मिळविण्यासाठी दूरध्वनी करू शकतात.

४) महिलांच्या हक्कासाठी, शोषणाविरूद्व, भेदभावाविरूध्द कायदे करण्यात आलेले आहे. पुरूषांच्या संपत्तीमध्ये महिलांना हक्क देण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. नौकरीत आरक्षण, राजकीय आरक्षण, १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती, स्त्री भ्रूण हत्येविरूद्व कायदा आदी अनेक उपाय व कायदे सरकारने केले आहेत.

➢ उपसंहार

महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात २००५ साली राष्ट्रीय पातळीवर जाहीर झालेली अधिकत आकडेवारी आश्चर्यचकीत करणारी आहे. या आकडेवारीनुसार ८५ टक्के गरीब तर ८० टक्के श्रीमंत कुटुंबातील महिला हिंसाचाराला बळी पडत आहेत.याशिवाय ६० टक्के मध्यमवर्गिय कुटुंबातही महिलांना शारीरिक आणि मानसिक त्रास होत असल्याचे समोर आले आहे. ही आकडेवारी पाहता कोणत्याही घरातील महिला ही घराबाहेर नव्हे तर स्वत:च्या घरातही सुरक्षित नाही हे सत्य नाकारून चालणार नाही. ८ मार्च हा जागतिक महिला दिन साजरा केला जातो. या दिनी समाजाच्या सर्वच स्तरातून महिलांवरील हिंसाचार व अत्याचाराचा निषेध केला जातो. महिलांच्या सुरक्षिततेसाठी जनमानसात आवाज उठविला जातो. महिलांच्या सुरक्षिततेसाठी केंद्र व राज्य सरकारच्या स्तरावर कायदे केले आहेत. महिलांच्या तक्रारीसाठी आणि तक्रार निवारण्यासाठी महिला आयोग स्थापन केले आहेत तरीसुध्दा महिलांवरील हिंसाचार आणि अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढतच आहेत. त्यामुळे महिलांनी सर्वप्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, जोपर्यंत महिला स्वत:वरील अन्यायाच्या आणि अत्याचाराच्या विरोधात लढण्यासाठी सामर्थ जुळवत नाही. आपल्यावर होणाऱ्या अत्याचारातून मुक्त होण्यासाठी लढत नाही. स्त्रियांवरील हिंसाराच्या विरोधात स्त्रिया संघटीत होत नाही तोपर्यंत सरकारने कितीही कायदे केले तरी महिलावरील हिंसाचार, अत्याचार, समस्या व प्रश्न सुटणार नाही.

संदर्भसुची

१) चौकट तोडून बघतांना : रश्मी दिवेकर/ प्रमिला नाईक, दिलासा स्त्री अत्याचार निवारण केंद्र वाद्रे ( पं.) मुंबई

२) कौटुंबिक हिंसाचार आणि महिला : डॉ. रघुनाथ महाजन, डॉ. संभाजी देसाई, प्रशांत बुक हाऊस

३) योजना : समर्थ महिला, समर्थ भारत, नोव्हेंबर—२००७

४) योजना :महिला सबलीकरण, जुन—२०१२

५) मराठी दैनिक : प्रहार १९ ऑक्टोंबर— २०१५

६)संशोधन लेख :समाजशास्त्रीय दष्टीकोनातून सांगली जिल्ह्यतील महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराच्या सद्यस्थितीचा अभ्यास : प्रा. पवळ रंजना भिमराव